# नाशिक महानगर पालिका, नाशिक
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## (जाहिरात)
### प्रयोग शाळा तंत्रज्ञ (मानधन) भरती बाबत
### थेट मुलाखत (Walk in Interview)

नाशिक महानगरपालिका नाशिक सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदाकरीता ०३ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात कोविड केअर सेंटर व कोविड रुग्णालयांसाठी मानधनावर भरती करणेकामी थेट मुलाखत (**Walk in Interview**) मा. अतिरिक्त आयुक्त (सेवा) यांचे दालनात दि. १३/०७/२०२० रोजी दु. २.३० वा. ठेवण्यात आले आहे. सर्व संबंधीत उमेदवारांनी किमान शैक्षणिक अहर्ता धारण करीत असल्यास आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह नाशिक महानगरपालिकेच्या मुख्यालयात उपस्थित रहावे.

**भरती करावयाची प्रयोग शाळा तंत्रज्ञ पदाची माहीती**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | मासिक मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | ५० | १७०००/- |

**पदनिहाय शैक्षणिक अहर्ता**

| अ.क्र. | पदनाम | आवश्यक शैक्षणिक अहर्ता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | बी.एस्सी., एम.एल.टी. / डी.एम.एल.टी. कोर्स | प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव |

- सदर पदाच्या पात्रतेकरीता कमाल वयोमर्यादा दि. १३/०७/२०२० रोजी वय ४३ वर्षे राहील.
- प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरीता किमान पात्रता बीएससी, एम.एल.टी., डीएमएलटी शासनाची मान्यता असलेल्या संस्थेच्या शासनमान्य कोर्स आवश्यक आहे.
- सदर पद हे तात्पुरत्या स्वरुपाचे असल्याने नाशिक महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवर कायम करण्याचा हक्क राहणार नाही.
- अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत असणारा अनुभव ग्राह्य धरला जाईल
- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रे रुजु होतांना मुळ कागदपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे.
- उमेदवारांनी पासपोर्ट साईझ २ फोटो , जन्म तारखेकरीता शाळा सोडल्याचा दाखला, फोटो आयडी करीता मतदान ओळखपत्र किंवा आयडी कार्ड शैक्षणिक अहर्ता कामी बीएससी शेवटच्या वर्षाची गुण पत्रिका, रजिस्ट्रेशन व नुतनीकरण प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.
- उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे राजकिय दबाव आणल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
- जाहीरात मध्ये बदल करणे, भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

Sdxxx/-
वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी
नाशिक महानगर पालिका, नाशिक.